

वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा
शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जग कधीच तुमच्या स्वाभिमानाची पर्वा करत नाही...
स्वत:बद्दल अभिमान बाळगण्याआधी काहीतरी करुन दाखवा...
स्वतःला सिध्द करा...


वर्ष : ०५ | अंक : १७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०१ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



पाहिजेत !! पाहिजेत !!


२० इंटरसिटी बसेससाठी
४० ड्रायव्हर्स...
२० हेल्पर्स पाहिजेत...
सचखंड बस सर्व्हिस
ट्रान्सपोर्ट– नगर, निगडी, पुणे – ४४.
: संपर्क :
पाटोळे : ९३२६८४३१७२ शितोळे : ९८८१६५७७९६


# मनोज जरांगे यांनी सरकारला दिला ऑप्शन नं.०२

## मराठा आरक्षणाच्या आंदोलनात मोठा ट्विस्ट...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, मुंबई :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला मराठा समजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी आता नवा पर्याय सूचवला आहे. उपसमितीची आज दोन वेळेस बैठक झाली. त्यांच्या म्हणण्यानुसार सुप्रीम कोर्टाच्या निर्णयात सरसकटला प्रोब्लेम आहे. पण असण्याचं कारण नाही. पण त्याला दुसराही पर्याय आहे. ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या ५८ लाख नोंदींच्या आधारे जीआर काढा. ज्या मराठ्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्यांची पोटजात उपजात म्हणून आपण आरक्षण द्या. सरसकट शब्द वापरु नका. त्या ५८ लाख नोंदींच्या आधारावर अध्यादेश काढा की, कुणबी ही उपजात आहे. २०१२ च्या कायद्याने ओबीसी आरक्षण मजबुत केलं. तुम्ही त्या कायद्यानुसार या आरक्षणासाठी पात्र ठरत आहात. मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत.




त्यामुळे मराठ्यांची कुणबी ही उपजात घ्या. ज्यांना कुणबी घ्यायचं आहे तो घेईल, ज्यांना नाही घ्यायचं तो घेणार नाही. सरसकट म्हणायची गरज नाही, असा नवा पर्याय मनोज जरांगे यांनी सुचवला.

आम्ही तुमच्या म्हणण्यानुसार, अभ्यासकांसोबत फक्त चर्चा केली. आम्ही कसलेही डॉक्युमेंट्स सरकारला देणार नाहीयत. त्याचं कारण असं, सरकारने १३ महिन्यांपूर्वी डॉक्युमेंट घेतले होते. आता देऊन उपयोग नाही. सरकारने १३ महिन्यांपूर्वी हैदराबात संस्थानकडून डॉक्यूमेंट्स घेतले. आंध्र प्रदेशचे मुख्य सचिव आणि आपल्या राज्याचे मुख्य सचिव यांनी हैदराबाद संस्थानच्या डॉक्युमेंट्सची टेस्टिंग केली. त्या उचलून आणल्या असत्या, इथल्या मागासवर्ग आयोगाला, केंद्राच्या मागासवर्ग आयोगाला, राज्याच्या कॅबिनेटला आणि इथल्या समितीला आणि २०१२ च्या कायद्याला म्हणजे हे पंचसूत्री आहे, ह्याला त्या मान्य झाल्या नसत्या. म्हणून इथल्या मुख्य सचिवांनी तिकडच्या मुख्य सचिवांकडून ॲडजेस्टेड करुन आणायचं होतं ते आणलं नाही. आता आमची चर्चा फक्त एवढ्यासाठी झाली की, काय केलं पाहिजे? सातार आणि हैदराबादच्या गॅझेटियरसाठी मी एक मिनिटही वेळ द्यायला तयार नाही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली.

सातारा संस्थानचं गॅझेटियर असेल तर एकदम सोपा विषय आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुरा बसतो. हैदराबादचं गॅझेटियर सांगतं की, मराठवाड्याचा मराठा हा कुणबी आहे. म्हणून त्यांना द्यायची काही गरज नाहीय. त्यांनी शिंदे समितीने सरकारला अहवाल देणं गरजेचं आहे. सरकारने राज्य मागास आयोगाकडून तो अहवाल जाणं गरजेचं आहे. त्यानंतर ते आरक्षण द्या. ते टिकवायचं आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. दीडशे वर्षांपूर्वीच्या नोंदी आहेत, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# लोकप्रिय मराठी अभिनेत्री प्रिया मराठेचे निधन



**दि.३०, मुंबई :** मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्रिया मराठेचे निधन झाले. ३१ ऑगस्ट रोजी ऐन गणेशोत्सवाच्या धामधुमीत हे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. वयाच्या ३८ व्या वर्षी अभिनेत्रीने अखेरचा श्वास घेतला. अशी माहिती समोर आली आहे की, कर्करोगाशी झुंज अपयशी ठरल्याने रविवारी सकाळी अभिनेत्रीची प्राणज्योत मालवली.

प्रिया मराठे ने सकाळी चार वाजता मीरा रोड याठिकाणी अखेरचा श्वास घेतला. श्रीकांत मोघे यांची सून आणि शंतनू मोघेची पत्नी असणारी प्रिया मराठीसह हिंदी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री होती. अशीही माहिती समोर आली आहे की, ती गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून कर्करोगाशी झुंज देत होती. अभिनेत्री गेल्यावर्षीपासून सोशल मीडियावरही विशेष सक्रिय नव्हती. तिने शेवटची पोस्ट ११ ऑगस्ट २०२४ रोजी केली होती. ज्यात तिने शंतनूसोबतचे फोटो पोस्ट केले आहेत.

'या सुखांनो या' या मालिकेतून तिने टीव्ही विश्वात पदार्पण केलेले. त्यानंतर प्रियाने 'चार दिवस सासूचे', 'तू तिथं मी', 'ऑलमोस्ट सुफळ संपूर्ण', 'येऊ कशी कशी मी नांदायला' अशा अनेक गाजलेल्या मराठी मालिकांमध्ये काम केले आहे. गोड चेहऱ्याच्या या अभिनेत्रीने 'तू तिथे मी', 'तुझेच मी गीत गात आहे'सारख्या मालिकांमध्ये नकारात्मक भूमिकाही साकारली होती. तिची 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेतील मोनिका तुफान गाजली, पण ही मालिकाही तिने अर्ध्यात सोडली होती. याशिवाय 'पवित्रा रिश्ता', 'उतरन', 'कसम से', 'बडे अच्छे लगते है' अशा हिंदी मालिकांमधूनही ती घराघरात पोहोचली. आपल्या दमदार अभिनयाने प्रियाने मराठी सिनेसृष्टीत एक वेगळं स्थान निर्माण केलं होतं. प्रियाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झाल्यास, प्रिया आणि शंतनू यांनी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली होती. त्यांनी 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेत एकत्र कामही केले होते.

# लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक आमनेसामने



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, पुणे :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मोठा दावा केला आहे. नीराकडून लोणंदच्या दिशेला जात असताना माझ्यावर हल्ला झाला, असा मोठा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. नीरा गावाजवळ हा हल्ला झाल्याचा आरोप हाके यांनी केला आहे. आपण चहा पिण्यासाठी थांबलेलो असताना आपल्यावर हल्ला झाला, असा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. खरंतर लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलकांचा एकमेकांना भिडण्याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. या व्हिडीओत हल्ला झाल्याचं स्पष्ट दिसत नाही. पण लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक यांच्यात तू तू मैं मैं होताना दिसत आहे. या घटनेनंतर लक्ष्मण हाकेंनी आपल्यावर हल्ला झाल्याचा दावा केला आहे.

नीराकडून लोणंदच्या दिशेने जात असताना निरा येथे चहा पिण्यासाठी थांबलेले असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक भिडले. पुणे जिल्ह्यातील नीरा या गावी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना मराठा आंदोलक भेटले. हाके यांचा सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये बोरी या गावी एक कार्यक्रम होता. त्यासाठी ते निघाले होते. पण नीरा येथे थांबले असताना लक्ष्मण हाके यांच्यासमोर काही मराठा आंदोलक आले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी लक्ष्मण हाके यांनी थेट रस्त्यावर बसूनच या सगळ्या विरोधी आंदोलनाचा निषेध व्यक्त केला.

**नेमकं काय घडलं?**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील नीरा येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या विरोधात मराठा तरुणांनी जोरदार घोषणाबाजी केली. हाके हे नीरा येथील एका हॉटेलमध्ये थांबले असताना ही घटना घडली. मराठा तरुणांना याची माहिती मिळताच त्यांनी हॉटेलबाहेर जमून हाके यांच्याविरोधात घोषणा दिल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही तरुणांना ताब्यात घेतले.

सध्या मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्य सरकारकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने मराठा समाजात संतापाचे वातावरण आहे. याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी मराठा आंदोलना विरोधात केलेल्या वक्तव्यांमुळे तरुणांमध्ये नाराजी पसरली आहे. हाके यांनी मराठा आरक्षणाला विरोध दर्शवत ओबीसी समाजाच्या हक्कांचे रक्षण करण्याची भूमिका घेतली आहे, ज्यामुळे दोन समाजांमध्ये तणाव वाढला आहे.

# पनीर, खवा खाणाऱ्यांनो सावधान! ३०० किलो बनावट माल जप्त



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, नागपूर :** लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच प्रिय असलेले आणि कुठल्याही भाजीबरोबर सहज एकरूप होऊन जाणारे पनीर आणि सणासुदीच्या दिवसांत पेढा, बर्फी किंवा तत्सम गोड पदार्थांमधील अविभाज्य घटक असलेला खवा जेवणाची लज्जत वाढवितात, हे खरेच. मात्र, तुम्ही या दोन्ही गोष्टी सर्रास कोणाहीकडून विकत घेत असाल तर थोडे सावध व्हा. या दोन्ही वस्तूंमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ असू शकते.

शुद्ध पनीरच्या नावे अनलॉग पनीरची विक्री केली जात असल्याची माहिती 'एफडीए'ला मिळाली. त्यानुसार विभागाच्या पथकाने शनिवारी दारोडकर चौक परिसरातील वर्धमान खवा भंडार येथे छापा टाकला. त्यावेळी तिथे २३१ किलो 'अनलॉग पनीर' तसेच पोत्यांमध्ये ८२ किलो खवा अस्वच्छ स्थितीत आढळला. त्यानंतर पनीरचा साठा ताबडतोब नष्ट करण्यात आल्याचे एफडीएचे सहायक आयुक्त अभय देशपांडे यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी मस्कासाथ येथून २ लाख २७ हजार रुपयांची ७७८ किलो सोप जप्त करण्यात आली होती. लेबल नियमानुसार नसणे आणि भेसळीच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. सणासुदीचा काळ सुरू असल्याने एफडीएने विशेष मोहीम हाती घेतली आहे. भेसळीचा संशय असेल तर त्यांनी तत्काळ एफडीएशी संपर्क साधावा, असे आवाहन देशपांडे यांनी केले. एफडीएचे सहआयुक्त कृष्णा जयपूरकर, अन्न सुरक्षा अधिकारी ललित सोयाम, अखिलेश राऊत, राहुल खंडागळे यांनी ही कारवाई केली.

**'अनलॉग पनीर' म्हणजे काय?**

अनलॉग पनीर हे पारंपरिक पनीरची नक्कल असलेले एक कृत्रिम उत्पादन आहे. हे पनीर खऱ्या दुधाऐवजी तर वनस्पती तेल, स्टार्च आणि दुधाच्या घन पदार्थांपासून बनवले जाते. हे पनीर दिसायला आणि चवीला खऱ्या पनीरसारखेच असते. परंतु, त्यातील पौष्टिक गुणधर्मांमध्ये फरक असतो. त्यात दुग्धजन्य प्रोटीनऐवजी वनस्पतिजन्य प्रोटीन वापरले जाते. अनलॉग पनीर निर्मितासाठी रितसर परवाना घ्यावा लागतो. ते खुले विकता येत नाही. मात्र, वर्धमान खवा भंडार येथे त्याची खुल्याने विक्री होत होती. त्यावर लेबलही नव्हते. त्यामुळे सुमारे ६१ हजार रुपयांचा हा साठा नष्ट करण्यात आला.

**पोत्यांमध्ये ठेवला होता खवा...**

खाद्यपदार्थांबाबत स्वच्छतेचे नियम पाळणे अनिवार्य आहे. असे असतानाही संबंधित दुकानात विक्रेत्याने पोत्यांमध्ये खवा ठेवला होता. निकृष्ट दर्जाच्या संशयावरून हा चाळीस हजारांचा खवा जप्त करण्यात आला आहे. त्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत, असे देशपांडे यांनी सांगितले.

# अतिक्रमित वन जमिनीवरील पट्टे देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करा : आ. सुधीर मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** पोंभुर्णा तालुक्यातील मौजा देवई, केमारा आणि भटारी गावांतील वनजमिनीवरील अतिक्रमण पट्टे देण्यासंदर्भात राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत अतिक्रमित जमिनींचे सर्वेक्षण, वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे, तसेच निस्तारहक्कपत्रांसाठी आवश्यक कार्यवाही आणि कायदेशीर प्रक्रिया यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. लाभार्थ्यांना पट्टे तात्काळ वितरित करण्यासाठी सर्व कागदपत्रे तपासून आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश आ.मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिले. पोंभुर्णा तालुक्यातील मौजा देवई, केमारा आणि भटारी येथील वनजमिनीवरील अतिक्रमण पट्टे देण्यासंदर्भात नियोजन भवनात पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते.



बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, आदिवासी चळवळीचे जिल्हा संघटक प्रमूख जगन येलके, गणेश परचाके सामजिक कार्यकर्ते, अल्का आत्राम, संध्याताई गुरनुले, डॉ. मंगेश गुलवाडे, रामपाल सिंग, अजय दुबे, हरीश ढवस, गोंडपिपरीच्या उपविभागीय अधिकारी लघिमा तिवारी, उपविभागीय अधिकारी अजय चरडे, पोंभुर्णाचे तहसीलदार मोहनिश शेलवटकर, वनपरिक्षेत्र अधिकारी फनिंद्र गादेवार तसेच संबंधित महसूल व वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, जमिनीबाबत तहसीलदार आणि वन अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांची सर्व कागदपत्रांची पडताळणी करावी, तसेच पट्ट्यांबाबत उद्भवलेले वाद संवादातून सोडवावे. शासनाच्या धोरणानुसार पात्र लाभार्थ्यांना पट्टे देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याची कार्यवाही करावी. महसूल तसेच वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण असेल तर कायद्यान्वये तपासून कॅम्प घेऊन पट्ट्याचा निर्णय घेता येईल. लाभार्थ्यांनी सर्व कागदपत्रे व पुरावे कॅम्पमध्ये घेऊन यावीत. जे पट्टे देता येईल ते तात्काळ दिले जावे. युद्ध पातळीवर कॅम्प घेऊन दाव्याची प्रकरणे निकाली काढावीत. सामुदायिक वनहक्क दाव्यांबाबत निस्तार हक्कपत्र देण्यासाठी शासन निर्णयानुसार त्रुटी पूर्ततेसाठी योग्य कागदपत्रासह तिन्ही गावांचे प्रस्ताव तयार करून आवश्यक कार्यवाही करा. सर्व कागदपत्रांची तपासणी करून अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करावी. वनजमिनीवरील अतिक्रमण पट्ट्यांबाबत समितीने दर आठवड्याला बैठक घेऊन महसूली व वनहक्काचे दावे निकाली काढावेत. असे निर्देश देखील त्यांनी बैठकीत दिले. प्रायोगिक स्तरावर पोंभुर्णा तालुक्यातील वनजमिनीवरील अतिक्रमण पट्ट्यांचा प्रश्न प्रथम मार्गी लावावा. त्यानंतर मूल व बल्लारपूर तालुक्यांतील विषय मार्गी लावण्यात येतील. जेवढे पट्टे वितरित करता येतील ते तातडीने वाटप करण्याचे नियोजन करावे, असेही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

# संपादकीय



## बिबट्याची डरकाळी

ऐन सणावाराच्या धामधुमीत नाशिकमध्ये हजारो लोकांच्या सहभागाने एक मोर्चा निघाला. हा जनक्षोभ होता चक्क बिबट्या आणि त्याहीपेक्षा वन विभागाविरुद्ध. नाशिकचाच एक भाग असलेल्या वडनेर परिसरात दोन-अडीच वर्षांच्या बालकाला बिबट्याने उचलून नेले. मूल दारापुढे खेळत असताना, त्याच्या जन्मदात्यासमक्षच ऐन राखीपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला ही घटना घडली.

या चिमुरड्याच्या कलेवराला त्याची लहानशी बहीण राखी बांधतानाचे दृश्य पाहून उपस्थितांचे हृदय पिळवटून निघाले. प्रसारमाध्यमांतील छायाचित्र पाहून सामान्यांच्याही डोळ्यांच्या कडा पाणावल्या. दुर्दैवाने त्याच दिवशी दिंडोरीतसुद्धा या हिंस्र श्वापदाच्या हल्ल्यात एका महिलेने जीव गमावला. या सलगच्या दोन घटनांमुळे लोकांच्या संतापाचा उद्रेक झाला. हजारो जण रस्त्यावर उतरले. त्यातून पिंजरे लावण्यासह नरभक्षी बिबट्यांना थेट गोळ्या घालण्याचीही मागणी न यावी तरच नवल!

बिबट्याला बिबट, बिबळ्या वा ग्रामीण भागात थेट 'वाघ'च म्हटले जाते. देशात सुमारे १३ हजार बिबटे असल्याचे केंद्राचा २०२३चा अहवाल सांगतो. महाराष्ट्रात मध्य प्रदेशनंतर सर्वाधिक दोन हजार बिबटे आहेत. प्रत्यक्षात त्यांची संख्या दुप्पट-तिप्पट असावी, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. राज्यात वर्षाकाठी तीस ते चाळीस बिबट्यांचा मृत्यू होतो. यापैकी बरेचसे अपघातात, तर काही शिकारीला बळी पडतात. वाघाच्या हल्ल्यात कोणी ठार होण्याच्या वृत्ताने जसा विदर्भवासीयांचा दिवस जात नाही, तसे राज्याच्या इतर भागांत बिबट्यांच्या हल्ल्याबाबत घडत असते. नाशिक परिसरात तर रोजच उपद्रव ठरलेला. या भागात ही श्वापदे पाचशेपेक्षा अधिक आहेत.

'उदंड जाहले बिबटे' अशी स्थिती असल्याने त्यांच्या हल्ल्याची आरडाओरड सतत सुरूच असते. अधूनमधून लहान मुले वा कधी मोठी माणसेही त्यांची शिकार ठरल्याच्या घटना घडतात. नाशिक-अहिल्यानगर परिसरात गेल्या वर्षात या जमातीने तब्बल तीस लोकांना ठार केले. पाळीव पशूंची हानी तर खिजगणतीतही नाही. बिबट्यांच्या दहशतीपायी शहरालगतच्या क्षेत्रांत लहान मुलांचे खेळ थांबले आहेत. माणसे सांजवेळीच्या आधीच शेतशिवारातून बाहेर पडू लागली आहेत. काही गावांत दिवसाही मुले-वयोवृद्ध मंडळी बाहेर पडत नाहीत.

बिबट्या हा प्रचंड अनाकलनीय प्राणी आहे. एक वेळ वाघाच्या वर्तनाचा अंदाज बांधला जाऊ शकतो; परंतु, बिबट्याबाबत सारेच अंदाज फोल ठरतात. तो अनेकदा पिंजऱ्यात येऊन जातो, तरी अडकत नाही. हा प्राणी अगदी सहज अधिवास बदलत असल्याने मानवाशी त्याचा संघर्ष ठरलेला. नाशिकलगत गोदावरी, दारणा, वालदेवी या नद्यांच्या काठांवर ऊस क्षेत्र वाढल्याने त्यांना लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. 'फास्ट फूड'सुद्धा सहज उपलब्ध होते. रात्रीच्या सुमारास शहरालगतच्या कचऱ्यात कुत्री, बकऱ्या खाद्य शोधतात आणि ते आयतेच बिबट्यांचे खाद्य बनतात. जंगले कमी होतच आहेत. मात्र, तेथील शिकारीपेक्षा शहरालगत कोंबडी, डुक्कर, कुत्रे, शेळी, बकरी व इतर पाळीव प्राण्यांची शिकार बिबट्यांना सहज शक्य होते.

अलीकडे बिबट्याचीसुद्धा जीवनशैली बदलली. जन्माला येणाऱ्या बछड्यांपैकी पूर्वी एखादाच जगत असे. आता मात्र चारही बछडे जगत असल्याचा निष्कर्ष वन विभागाने काढला आहे. त्याचे जन्म, सावज शोधण्याचे प्रशिक्षण आणि मृत्यूही जंगलाऐवजी उसालगतच होत असल्याचे दिसते. खरे तर ही श्वापदे जगविताना, त्यांच्या सुरक्षित अधिवासाच्या उपाययोजना करताना, माणसांच्या जिवाला धोका होणार नाही, याचा प्राधान्याने विचार करण्याची हीच योग्य वेळ. शहरात धुमाकूळ घालणारी हिंस्र श्वापदे जगवायची की माणसे, याचेही धोरण नजीकच्या काळात ठरवावे लागेल. वन विभाग, वन्यजीवप्रेमी आणि सरकारांचे सर्वसमावेशक प्रयत्न जसे गरजेचे आहेत, तशी नागरिकांच्याही वर्तनात सुधारणा आवश्यकच. अन्यथा, कबुतरे, कुत्री, मांजरांच्या उपद्रवाच्या मालिकेत बिबट्यांचाही समावेश व्हायचा आणि आणखी कोठे त्यांना थेट गोळ्या घालण्याची भाषा केली गेल्यास पंचाईत होऊन भलतेच प्रश्न निर्माण व्हायचे!

# आली गौराई सोनंपावली..!

आनंद, उत्कर्ष, चैतन्य, भक्तीभावबंधाचा अनोखा महोत्सव म्हणजेच वर्षा ऋतू.. वर्षा ऋतूत निसर्ग संपदेची भरभराट असते. आषाढ.. श्रावण.. भाद्रपद मासात तर दिनदिन उत्सव साजरा होत असतो. आपली संस्कृती निसर्गपूरक पौराणिक वारसा चालविणारी आहे. आपले व्रतवैकल्ये संस्कृतीची अविभाज्य अंगे बनली आहे.पौराणिक संदर्भानुसार भगवान श्रीहरी विष्णू देवशयनी एकादशी पासून तर कार्तिकी देवउठणी एकादशी पर्यंत क्षीरसागरात शेषशय्येवर योगनिद्रेस प्रारंभ करतात, त्यांच्या गैरहजेरीत देवाधिदेव भगवान श्री शंकरांकडे सृष्टीचे चक्र सांभाळण्याचे सूत्र प्रदान करतात. या काळात संपूर्ण श्रावण मासात श्री शंकराची उपासना केली जाते. श्रावणानंतर शिव गौरींचे पुत्र विघ्नहर्ता वरदविनायकाचे आगमन घरोघरी होते. तर भाद्रपद शुक्ल अष्टमीला आद्यदेवी पार्वतींचे गौराईच्या रूपाने आराधनेस प्रारंभ होतो.


भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्ष अनुराधा नक्षत्रावर गौराई (ज्येष्ठा- कनिष्ठा) चे आगमन होत असते. पुढे सलग तीन दिवस आवाहन, पूजन, महाआरती असा त्रिदिवसीय उपासना विधींचा क्रम मोठ्या श्रद्धेने, भक्तीभावाने नियोजनाने परिपूर्णरित्या साजरा होतो. ही 'गौराई' आपल्या माहेरी माहेरवाशीन म्हणून आलेली असते. गौर वर्णाची म्हणून 'गौराई' नांवलौकीकास आहे.

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षात अनुराधा नक्षत्रावर गौराई (ज्येष्ठा- कनिष्ठा) चे आगमन होत असते. पुढे सलग तीन दिवस आवाहन, पूजन, महाआरती असा त्रि दिवसिय उपासना विधींचा क्रम मोठ्या श्रद्धेने, भक्ती भावाने साजरा होतो. ही गौराई आपल्या माहेरी माहेरवासीन म्हणून आलेली असते.गौर वर्णाची म्हणून गौराई असे तिला म्हटले जाते. विदर्भात तिला महालक्ष्मी म्हटले जाते.गौराई ही एकटी येत नाही,तर त्या दोघी बहिणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा आपल्या बाळांसोबत येतात. गौराई गणपतीची आई म्हणजेच पार्वती माता आणि माता लक्ष्मीची मोठी बहीण मानली जाते. माहेरवासीन लेकी प्रमाणेच आनंदाचे



शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो.९१३०८३५४५८


तिचे स्वागत होते. तिला सुख मिळावे म्हणून



तिची धार्मिक प्रथा रीती रिवाजानुसार सरबराई केली जाते.

पौराणिक कथेच्या संदर्भानुसार असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण येतात. शरण आलेल्या स्त्रियांच्या प्रसादार्थ गौराईंनी स्त्रियांचे रक्षण केले.भाद्रपद शुक्ल सप्तमीला गौराईने असुरांचा संहार करून असुरांच्या भयातून मुक्तता केली. अखंड सौभाग्याच्या अभिलाषेपाई गौराईचा कृपाप्रसाद असाचं कायम राहावा; या श्रद्धा भावाने स्त्रिया गौराईचे व्रत आजही मोठ्या भक्ती भावाने कुटुंबासमावेत करतात. एवढेच नव्हे,तर तिच्या आगमनार्थ स्त्रिया नाचत बागडत गीते सुद्धा म्हणतात..

**चला गो सयांनो चला गौराई पुजुया...**
**गौराई पुजुया..गौराई पुजुया..**
**तिला मानपानं देऊया...**

**आली गौराई सोनंपावली,**
**अंग भरून लेण ती न्याली...**

**लेकीबाईंची ती माय माऊली..**
**देईल ती सुखाची सावली...!**

# सरकारी शक्तीचा दुरुपयोग नको...!!

राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने गुरुवारी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासंदर्भातील शासन निर्णय जारी करताच हा वादग्रस्त मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेतून कोल्हापूर जिल्ह्याला वगळण्यात आल्याचे म्हटले जात होते. प्रत्यक्षात हा महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड आणि आजरा या तालुक्यातूनच जाणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयातून स्पष्ट होत आहे. याचाच अर्थ राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीआधी जो शासन निर्णय काढला होता, तोदेखील या निर्णयाने रद्द झाला आहे. ही कोल्हापूरच्या शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. राज्यातील १२ जिल्हे, ३९ तालुके आणि ३७० गावांमधून जाणारा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी असा ८०२ किलोमीटरचा हा महामार्ग आहे. या महामार्गाच्या माध्यमातून तुळजापूर, कोल्हापूर, माहूर यांसह १८ धार्मिक स्थळांना जोडण्याचे नियोजन आहे. या महामार्गासाठी १२ जिल्ह्यातील २७ हजार ५०० एकर जमीन संपादित केली जाणार आहे. त्यामुळे मागील एक वर्षाहून अधिक काळापासून शक्तिपीठ महामार्गाला पश्चिम महाराष्ट्रातून जोरदार विरोध होत आहे.

१२ पैकी १० जिल्ह्यांमधील शेतकरी फेब्रुवारी २०२४ पासून आंदोलन करत आहेत. त्यातही प्रामुख्याने कोल्हापुरातील शेतकऱ्यांच्या जमिनी या भूसंपादनात जास्त प्रमाणात जाणार असल्याने ते या महामार्गाच्याविरोधात आक्रमक होत एकवटले आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदारसंघात शक्तिपीठ महामार्गाचा फटका महायुतीला बसल्यामुळे महायुतीचे बहुतांश आमदार आधीपासूनच सावध झाले होते. विधानसभा निवडणुकीत या नाराजीच्या लाटेचा तडाखा बसू नये म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने १५ ऑक्टोबर २०२४ ला कोल्हापूर जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्ग रद्द केल्याची अधिसूचना काढली होती. मात्र, कोल्हापूरकरांसाठी हे क्षणभंगूर स्वप्न ठरले. कारण निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेताच देवेंद्र फडणवीस यांनी आपला ड्रीम प्रोजेक्ट पुन्हा पोतडीतून बाहेर काढला. एवढेच नाही तर कितीही अडचणी आल्या तरी हा प्रकल्प पुढे रेटून नेण्याचा इरादाही जाहीररित्या सांगून टाकला. पुढच्या थोड्याच दिवसांनी मंत्रिमंडळ बैठकीत शक्तिपीठ प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीला मान्यता देणारा निर्णय घेण्यात आला. त्याचे पडसाद मंत्रिमंडळ बैठकीसह कोल्हापुरातही उमटले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह इतर मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तीव्र भावनांची माहिती दिली. त्यानंतर झालेल्या बैठकीपासून हा विषय रेंगाळत होता. शक्तिपीठ महामार्गामुळे कोकण वा गोव्यात पोहोचण्यासाठी नवा पर्याय उपलब्ध होईल, इंधन, प्रवासाचा वेळ वाचेल, पर्यटनाला चालना मिळेल, असा सरकारचा दावा आहे. जो योग्यही आहे. पण, त्याचसोबत सरकारने ही वस्तुस्थिती देखील लक्षात घेतली पाहिजे की याआधीच मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व इतर काही मार्गाच्या भूसंपादनात शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी गेल्या आहेत. म्हणूनच पुन्हा शक्तिपीठसाठी आपली जमीन देण्यास इथले शेतकरी तयार नाहीत. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे या भूसंपादनामुळे हाल आणखीनच वाढणार आहेत. कारण त्यांच्या जमिनी आता गुंठ्यावर आल्या आहेत. पुन्हा भूसंपादन झाल्यास शेतकरी अल्पभूधारक अथवा भूमीहीन व पुढे विस्थापित होऊ शकतो. सध्याच्या जमिनी याच शेतकऱ्यांच्या जगण्याचे एकमेव साधन आहे. अशावेळी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही या जिल्ह्यांत निर्माण होऊ शकतो. त्यातून पुढे आत्महत्या व कायदा-सुव्यवस्थेचे वेगळे प्रश्न निर्माण होऊ शकतात. अनेक गावांमध्ये औद्योगिकीकरण, नागरीकरण होत असल्याने जमिनीचे भावदेखील वाढले आहेत. त्यांच्या भरपाईबाबतचे अनेक प्रश्नही अद्याप अनुत्तरीत आहेत. विदर्भ व मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत जमिनींची मोजणी, अधिग्रहण सुरू असताना कोल्हापूर जिल्हा मागच्या काही महिन्यांपासून तसा शांतच होता. परंतु नव्या शासन निर्णयामुळे जिल्ह्यातील अस्वस्थता पुन्हा वाढली आहे. महामार्गाच्या मूळ आखणीला पर्यायी मार्ग शोधण्याची जबाबदारी राज्य सरकारने महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळावर सोपवली आहे. सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय तपासून तसा प्रस्ताव राज्य सरकारला सादर करावा, असे आदेश रस्ते विकास महामंडळाला शासनाने दिले आहेत. शिवाय हा पर्याय शोधताना जिल्ह्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली जाणार आहे. सरकारची ही भूमिका सकारात्मक म्हणावी लागेल. सरकार खरोखरच पर्यायी मार्गाचा विचार करत असेल, तर शासन निर्णयात कोल्हापुतील तालुक्यांचा समावेश करण्याची काहीच गरज नव्हती. कारण यामुळे सरकार पर्यायी जागा शोधल्याचा दिखावा करून पुन्हा यूटर्न घेण्याची शक्यता असल्याचा संशय व्यक्त केला जातोय. विकास म्हणजे केवळ ठेकेदारांच्या भल्याचा विचार करणे नव्हे. या महामार्गात डोंगर पोखरून बोगदे निर्माण केले जातील, अनेक ठिकाणी भर घालून छोट्या नद्या-नाले बुजवले जातील. मध्यंतरी आलेल्या जोरदार पावसामुळे समृद्धी महामार्गालगतच्या शेतात पाणी तुंबण्याचे दृश्य समोर आले होते. त्यामुळे सरकारला खरोखरच हा महामार्ग विकासाचा महामार्ग व्हावा, असे वाटत असेल, तर शासकीय शक्तीचा दुरुपयोग न करता तसेच शेतकऱ्यांचे नुकसान होऊ न देता मध्यम मार्ग काढण्याची गरज आहे.


**- शिवाजी विठ्ठल चौगुले**
**कागल-कोल्हापूर.**


# वाहतूक कोंडी मोठी समस्या !

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही सध्याची मोठी समस्या बनली आहे. दिवस असो की रात्र, वेळ कोणतीही असो रस्ता कोणताही असो मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई किंवा मुंबईतून कुठेही जाणारे राज्य - राष्ट्रीय महामार्ग सगळीकडे प्रचंड वाहतूक कोंडी दिसते. पूर्वी हे चित्र शनिवार, रविवार किंवा जोडून सुट्ट्या आलेल्या दिवशी व्हायची आता ती रोजच होती. या वाहतूक कोंडीने रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या असतात त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ज्या प्रवासास पूर्वी एक ते दीड तास लागायचा त्याच प्रवासासाठी नागरिकांचा आता दुप्पट वेळ लागत आहे. सकाळ, संध्याकाळ यासारख्या पीक अवरमध्ये तर वाहने अगदी कासव गतीने धावतात. वाढत्या वाहन कोंडीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे. ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने उड्डाणपूल केले पण आता त्याच उड्डाणपुलावर वाहनांची कोंडी होताना दिसत आहे. अनेक प्रयत्न करूनही वाहतूक कोंडी कमी करण्यात प्रशासनाला यश येत नाही. वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहे ते म्हणजे वाहनांची वाढती संख्या. वाढत्या वाहतूक कोंडीला वाहनांची प्रचंड संख्या जबाबदार आहे. आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. दरवर्षी त्यात हजारो वाहनांची भर पडते. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली तशीच पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या



पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात परिणामी अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे. पार्किंगची सोय नसल्याने नागरिक रस्त्यांच्या कडेला आपल्या गाड्या पार्क करतात त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन, प्रशासनाकडून नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. नवीन वाहन विकत घेऊन नागरिक आपल्या खाजगी वाहनांनी प्रवास करत आहे. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगली सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने जर या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्या तर नागरिक स्वतःच्या वाहनांनी प्रवास न करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहनाची संख्या कमी झाली की रस्त्यांवरील वाहतूक कोंडी देखील कमी होईल. जर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याची शासन प्रशासनाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी आधी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करूनच वाहतूक कोंडी रोखता येईल.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५


## गौरी गणपती..

देवी सह गणेशाची
नित्य करतो आरती
गौरी माते नमूनिया
मागत राहतो शक्ती

आम्ही देवींचे भक्त
अव्याहत करे भक्ती
शक्तीपाठ पूजा थाट
भजत राहे नवराती

सजावटमनोरम्य ती
पक्वान्न भोग किती
नात्यांचा सुरेख सण
सजे गौरी गणपती

देवीस भजतो परंतु
भिन्नउक्ती अन् कृती
महिला भासे अबला
इथे आमची विकृती

हव्या दिव्यात वाती
उजळे प्रकाशदिप्ती
नव चष्म्यातूनि पहा
सणास गौरीगणपती

विघ्नहर्त्या बुध्दी देई
कळोआम्हा संस्कृती
देवी गजानना वंदता
उजळो जन जागृती


**हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**


अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३१, डोंबिवली (ठाणे) :** सध्या सुरू असलेला गणेशोत्सव व आगामी ईद-ए-मिलाद सणाचे आयोजन शांततेत व सुरक्षिततेत पार पडावे. यासाठी डोंबिवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. हा रूट मार्च दुपारी १.१५ वाजता डोंबिवली पोलिस ठाणे येथून सुरू झाला. केळकर रोड, श्रीमती इंदिरा गांधी चौक, मानपाडा रोड, चार रस्ता, टिळक चौक, सावरकर रोड, आप्पा दातार चौक, गणेश मंदिर संस्थान, नेहरू रोड या प्रमुख मार्गांवरून हा मार्च निघाला. यानंतर दुपारी २ वाजता तो पुन्हा डोंबिवली पोलिस ठाण्यात संपन्न झाला. सदर रूट मार्चमध्ये एकूण ३ पोलीस निरीक्षक, ७ सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक, ५५ पोलीस अंमलदार, ८ होमगार्ड यांसह १ सीआरएम मोबाईल व १ पीटर मोबाईल सहभागी झाले होते. सणासुदीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांमध्ये विश्वास निर्माण व्हावा व कोणत्याही अनुचित प्रकारांना आळा बसावा यासाठी हा रूट मार्च आयोजित करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## तब्बल ४१ तासानंतर वाहून गेलेल्या युवकाचा मृतदेह सापडला



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**


**दि.३१, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील मौजे खोरस येथील २५ वर्षीय युवक परमेश्वर खंडागळे दि.२८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान शेतातून घरी परतत असताना नदी काठावरून जाते वेळेस पाय घसरून पडल्याने नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात वाहून गेला होता. दोन दिवस अथक परिश्रम घेतल्यानंतर सुद्धा मृतदेह सापडून येत नव्हता. दि.३१ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजल्यापासूनच बोटीच्या सहाय्याने पुन्हा शोधकार्य सुरू केले. नदीचे पुराचे पाणी ओसरल्यामुळे पडलेल्या ठिकाणाहून तब्बल दीड किलोमीटर नदीपात्रामध्ये वाहून जात वाळूमध्ये रुतलेल्या अवस्थेत मृतदेह सापडून आला. तब्बल ४१ तासानंतर मृतदेह सापडल्यामुळे शोधकार्य स्थगित करण्यात आले व नदीपत्रातून मृतदेह बाहेर काढून कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. या सर्व प्रकारावर पहिल्या दिवसापासूनच नियंत्रण ठेवून असलेले गंगाखेडचे उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, पालम तहसीलचे प्रभारी तहसीलदार उषाकिरण शृंगारे, नायब तहसीलदार भागवत तेलभरे, पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे, महसूल अधिकारी शिवप्रसाद वायवळ, तलाठी शुभांगी आळे, तसेच माधव कांबळे, महिपती कांबळे,सुनील चव्हाण, लक्ष्मण जाधव, देवानंद शिनगारे व इतर तहसीलचे कर्मचारी,पोलिस कर्मचारी उपस्थित होते. तसेच शोध मोहीमेत अग्निशमन दल गंगाखेड व अग्निशमन दल पूर्णा तसेच शोध कार्य टीम मधील राम विलास खंडेलवाल, श्याम जगतकर, श्रीकांत साळवे, अभिषेक साळवे, सुरज खंडेलवाल, आकाश लव्हाळे, सिताराम भेंडेकर, राज पैठणी, सोनाजी खिल्लारे राजेश चावडीया यांनी कठोर मेहनत घेऊन अखेर मृतदेह सापडल्यानंतर सुटकेचा निस्वास सोडला.

## साताऱ्याच्या आयटी पार्कचे एक पाऊल पुढे

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३१, सातारा :** गेले अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या सातारा आयटी पार्कबाबत शासनाकडून सकारात्मक पावले उचलली गेली आहेत. प्रस्तावित आयटी पार्कसाठी नागेवाडी, लिंब खिंड येथील ४२ हेक्टर जागेचा एमआयडीसीकडून ड्रोन सर्व्हे करण्यात आला. सातारा जिल्हावासीयांच्या अशा यामुळे पल्लवित झाल्या आहेत. सातारा जिल्ह्यातील बहुसंख्य युवक नोकरीसाठी इतरत्र ठिकाणी स्थायिक आहेत. अशा युवकांना जिल्ह्यातच रोजगार निर्माण व्हावा यासाठी युवा पिढी आग्रही आहे. यासाठी जिल्ह्यातील आयटी पार्कसाठी खुप मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले आहेत. यासंदर्भात खासदार उदयनराजे भोसले यांनी केंद्र शासनाकडे, तर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. मंत्री सामंत यांनी ही त्यासाठी एप्रिल २०२५ मध्ये लिंब खिंडीत आयटी पार्क सुरू होईल, अशी ग्वाही साताऱ्यात एका कार्यक्रमात दिली होती. यासाठी जागेची अडचण होती, त्यावर महसूल विभागाची लिंब खिंड येथे असलेली सुमारे ४२ हेक्टर जागेचा पर्याय समोर आला. ही मोठी जागा राष्ट्रीय महामार्ग नजीक असल्यामुळे सोयीस्कर आहे. यामुळे याठिकाणी आयटी पार्क व्हावे, अशी यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू होता. महसूल विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यामुळे जागेच्या हस्तांतरणाचा प्रश्न सुटला. त्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया वेगाने सुरू झाली. आता या जागेचे ड्रोन सर्व्हेक्षण करण्यात आले. आता अधिसूचना निघण्याची प्रतीक्षा आहे. अधिसूचना मिळताच हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होणार आहे. यानंतर साताऱ्यात आयटी पार्कच्या कामाला प्रत्यक्ष गती मिळेल. साताऱ्यात आयटी उद्योगाची दारे खुली होणार असल्यामुळे तरुणाईत उत्साहाचे वातावरण आहे.

## पुयणी येथील वाहून गेलेल्या पर्यायी पुलाची जिल्हाधिकाऱ्याकडून पाहणी



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.३१, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात मागील काही दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पुयणी जवळील लेंडी नदीवरील निमर्णाधीन पुलाजवळील पर्यायी पुल पुराच्या पाण्यात वाहून गेला. परंतु आजतागायत गुत्तेदाराने या पुलाच्या बांधकामाकडे लक्ष न दिल्यामुळे पुयनीसह इतर सात गावांचा पालम शी संपर्क तुटलेलाच आहे. या तुटलेल्या पुलाची व अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पाहणी दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सदरील पर्यायी पूल तात्काळ करण्याबाबतच्या सूचना दिल्या व शेतात जाऊन शेतीत झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणीही केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्या सोबत उपविभागीय अधिकारी युवराज डापकर, तहसीलदार उषाकिरण शृंगारे व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## पाटण तालुक्यात गौराईची प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.३१, पाटण (सातारा) :** गणरायाच्या मंगलमय, जल्लोषपूर्ण आगमनानंतर पाटण शहरासह तालुक्याच्या विविध विभागांमध्ये रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सोनपावलांनी गौरी, महालक्ष्मीचे आगमन, घरोघरी झाले सुख - समृध्दी आणि आनंदाचा संदेश देत मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात महिलांनी घरोघरी गौराईची प्रतिष्ठापना केली. गौरींच्या आगमनाची दिवशी पाटणची बाजारपेठ गर्दीने फुलून गेली होती. सायंकाळी मुली व महिला वर्गाने गौराईंची पूजा करून फुलवरा आणण्यासाठी केरा नदी काठावर जावून त्या ठिकाणी गौराईंची गाणी सादर केली. गणेशोत्सवात गौराई माहेरवाशिणी च्या रूपाने सोनपावलाने घरोघरी येतात.

सकाळपासूनच महिलांनी गौरींच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू केली होती. गौरीच्या सजावटीसाठी लागणाऱ्यासाहित्याची खरेदी करण्याबरोबरच गौराई समोर ठेवण्यासाठी गोडधोड पदार्थ खरेदी करण्यासाठीमहिलांनी मोठी गर्दी केली होती. पूर्वी सणासुदीला लागणारे गोडधोडपदार्थ स्वत: च्या हाताने तयार करूनठेवले जात होते. बदलत्या युगातरेडिमेड फराळाच्या पदार्थांनामहिलांनी पसंती दिली असून यामध्येबुंदीचे लाडू शेव-चिवडा, करंजी, शंकरपाळी, चकली, आळुवडी, म्हेसूरपाक, गुलाबजाम, अनारस, खव्याचे मोदक आदींसह विविधप्रकारचे गोडधोड पदार्थविक्रीसाठी बाजारपेठेत उपलब्ध झाले होते. पाटणसह तालुक्यात दिवसभर महिलांच्या आनंदाला उधाण आले होते. नऊवारी साडी, नाकात नथ, हातामध्ये चुडा, डोक्यात वेणी आदी पेहराव करून सुहासिनी महिला गौराईच्या आगमनासाठी सज्ज झाल्या होत्या. दुपारपर्यंत पाटणसह परिसरात उत्साही, आनंदी वातावरणात गौराईंचे आगमन झाले. महिलांच्या मध्ये मोठा उत्साह दिसत आहे.

## जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून कोथळा येथील युवकाचे आमरण उपोषण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, नांदेड :** संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठ्यांना ओबीसी मधून सरसकट आरक्षण मिळावे याकरिता मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांना पाठिंबा म्हणून महाराष्ट्रभर वेगवेगळ्या जिल्हा, तालुका आणि गावांच्या ठिकाणी मराठा बांधव आमरण उपोषणास बसत आहेत. त्याचप्रमाणे कोथळा येथील तरुण युवक आदरणीय संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून उपोषणास बसला आहे. त्या युवकाचे नाव समाधान शिवराम शिंदे असे असून त्याचे वय फक्त १८ वर्ष आहे. या मुलाचे वय कमी असून सुद्धा तो मराठा आरक्षणाचा लढामध्ये सहभागी झालेला आहे. त्याचे कारण म्हणजे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतरांच्या तुलनेत शाळा, महाविद्यालयात भरावी लागत असलेली भरमसाठ फीस, एक - एका गुणामुळे नोकरी पासून वंचित राहिलेले मराठा समाजातील तरुण, या सर्व कारणांमुळे आत्महत्या करत असलेले मराठा युवक ही सर्व परिस्थिती त्याने व अखंड मराठा समाजाने व संबंध महाराष्ट्राने बघितलेली आहे. झालेल्या विधानसभा निवडणुकांचा निकाल बघता सरकारला मराठा लाट ओसरल्याचे वाटत होते. पण पहिल्यापेक्षाही अधिक लाख पटीने मराठा बांधव व भगिनी या लढ्यामध्ये सहभागी होताना दिसत आहेत.



तसेच हदगाव तालुक्यातील हाडसणी गावचे भूमिपुत्र दत्ता पाटील हे सुद्धा नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून आमरण उपोषणास बसलेले आहेत. दत्ता पाटील हे मागच्या २ वर्षापासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहेत व ते यासाठी वेळोवेळी उपोषणाला बसलेले आहेत.

## जिल्ह्यातील नोंदणीकृत भजनी मंडळांनी साहित्य अनुदानासाठी अर्ज करावे

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते विदर्भ सचिव इढोळे यांचे आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, वाशीम :** महाराष्ट्राच्या सर्व लोककला टिकून राहाव्यात व लोककलांची पुढील पिढीला माहिती व्हावी. संत पारंपारिक लोककलांचे जतन व्हावे या हेतूने कलापथकांना भजनी मंडळांना आर्थिक मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे.

यातून भजनी मंडळांना त्यांना आवश्यक असणाऱ्या हार्मोनियम मृदक, पखवाज, विना, तंबोरा, एकतारी, टाळ संगीत आदी वाद्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे भजनी मंडळांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.




प्रत्येकी भजनी मंडळांना २५००० ची अर्थसहाय्य देण्यात येणार आहे म्हणून वाशिम जिल्ह्यातील अनुदनिकृत भजनी मंडळांनी शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज करावा असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते विदर्भ सचिव राम इढोळे यांनी केले आहे.

पुढे बोलताना राम इढोळे म्हणाले की, भजनी मंडळांना शासनाच्या वतीने पहिल्या टप्प्यात ८०० भजनी मंडळांना प्रत्येक २५ हजार रुपये याप्रमाणे ४ कोटी ५० लाखांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आलेली आहे. म्हणून नोंदणीकृत भजनी मंडळांनी जास्तीत जास्त या अर्थसाह्याचा फायदा घ्यावा. असे आवाहन देखील राम इढोळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून आवाहन केले आहे.

## उजळणी ते जीवनाचं गणित...

वर्ग पहिलीत प्रवेश घेतल्यावर माय मराठीच्या बालभारती बरोबर गणिताचे पुस्तक भेटलं.रंगीत मुखपृष्ठावर आकर्षक असं मोठ्या क्षरात एक-दोन लिहिलेलं होतं.एक पाटी त्याच्या बाजूला दोन पोरं आकडे गिरवत आहे असं चित्र होतं.नैसर्गिक वातावरणात उडणारे फुलपाखरू वगैरे त्यामुळे पुस्तकाविषयी आकर्षण अधिकच वाढलं होतं.हातात घेतल्याबरोबर त्याच्या प्रेमात पडावं असं हे पुस्तक उकललं की,आतील पानावर उजळणी,एक ते दहा असं पहिल्या प्रकरणात होतं. या आकड्याचे वाचन एक, दोन,तीन...! असं पाठ करणं सोपं झालं.पण त्याचं व्यवस्थित लिखाण कसं करावं? म्हणून गुरुजींनी फळ्यावर उजळणी रेखाटली.पहिल्या पानावर रंगीबेरंगी फुलपाखरे,फळांचे, प्राण्यांचे चित्र होते त्यामुळे मन प्रसन्न व्हायचं.नुसतं बघत बसायचो. सुरुवातीला उजळणीतील शून्य गुरुजींनी शिकवला.तशी त्याची किंमत काहीच नसते परंतु,एका समोर मांडला तर तर त्याची किंमत दहा पटीने वाढवतो.एवढं सामर्थ्य शून्यात असतं.आकड्यांच्या बाजारात सर्वात मौल्यवान आकडा जर कोणता असेल तर,तो शून्यच आहे कारण,एकाला कोटी बनवण्याचे सामर्थ्य त्याच्यात असते.

गुरुजींनी पुस्तक,पाटी,लेखन दप्तरातून काढायला लावली. फरशीवर बसून मांडीवर घेतलेल्या काळ्या पाटीवर पांढऱ्या लेखनीने गुरुजींनी फळ्यावर काढलेला शून्य पाहून-पाहून गिरवला.गुरुजी या शून्याला उपमा देत.कधी त्याला मायने हाताने बनवलेल्या चुलीवरची गोल-गोल भाकर तर कधी भोपळा म्हणायचे.या त्यांच्या हसत-खेळत शिकवण्यामुळे गणिताची ओढ लागली. व आर्यभट्ट यांनी शोधून काढलेल्या शून्याला लागूनच एक रेषा खेचली तर त्याचा एक बनला.गणितातील आकडे समजून पाटीवर गिरवायची सुरुवात झाली. ते आजतागायात आयुष्यात त्याच्यापासून पान हालत नाही. पावलोपालोही त्याचा कुठेतरी उपयोग आहेच.कधी वेळ,तारीख,पैसे हिशोब घ्या किंवा इतर ठिकाणी या एकाने जीवनात सुरुवात झाली. आकर्षक अश्या शाळेतील पुस्तकात एकासमोर एक फुल,एक चेंडू असं छापलेलं होतं.एक म्हणजे एक वस्तू असं मोजायला अन समजायला सोपं झालं.त्यानंतर गुरुजींनी दोन तीन नऊ पर्यंत रेखाटन करून फळ्यावर चिन्हांच्या स्वरूपात रेखाटून दिले. आम्ही पोरं डब्याच्या पाटीवर एका शिस्तीत एक दोन गिरवू लागलो ते नऊ पर्यंत...! घरी कधी मायने तर कधी बाबाने हातात लेखन घेऊन गिरवणं शिकवलं. कधी-कधी प्रेमाने गुरुजींनी जवळ येऊन प्रत्यक्ष हात धरून गिरवायला शिकवलं.गुरुजींनी प्रेमाने शिकवलेलं अजूनही कायम लक्षात आहे.

शून्य ते नऊ पाटीवर गुरुजींनी गिरवायला शिकवल्यावर फळ्यावर मोठ्या अक्षरात लिहिलेलं असल्याचं ते फळ्याजवळ बोलावून काडीने वाचायला लावत असत. हातात काडी घेऊन शून्य या अंकावर शून्य म्हणायचं बाकीचे पाठीमागे म्हणायचे. असं नऊ पर्यंत म्हणायचो. असं नऊ पर्यंत वाचलं कि मुलं परत पाठीमागे म्हणायचे.एका सुरातील तो आवाज ऐकण्यास खूप छान वाटायचा.गुरुजी बाजूला लाकडी खुर्चीत बसलेल्या असायचे. एवढ्या पोरांसमोरं अन गुरुजीसमोर वाचायचं म्हणजे जीव घाबरायचा.हात पाय लटलट कापायचे. हातातील काडी हीच गुरुजींची छडी होती.हीच छडी आमच्यासाठी शिस्त लागण्याचं अन विद्याप्राप्तीच जणू जबरदस्त माध्यम होतं. थोडी थोडी बोबडी वळायची. पण फळ्यासमोर जाऊन वाचायचा नंबर आला म्हणजे वाचा वच लागायचं.तेच फळ्यासमोरील वाचनाने जीवनाचा कायापालट व जगण्यास बळ मिळालं. नाही अर्थतज्ञ किंवा गणित तज्ञ झालो,परंतु भविष्यात जीवनाचे गणित सुधारण्यातस मदत झाली. त्यातून हिशोबाचंज्ञान आणि फसव्या खोटारड्या दुनियेत आर्थिक व्यवहार कसा करायचा तो कळला. अन्यथा या दुनियेत अज्ञानपणाच्या नावाखाली कितीतरी ठिकाणी लुटलं असतं.

एक दोन चं ज्ञान झाल्यानंतर ११ ते १०० पर्यंत आकड्यांची ओळख गुरुजींनी करून दिली. या शून्य ते नवातूनच पुढील कोटीपर्यंतची आकड्यांची ओळख,वाचन आण लिहायला गुरुजींनी शिकवलं.एकावर एक अकरा ते एकावर दोन शून्य म्हणजे शंभर हे शिकता-शिकता चौथीपर्यंत गणितातून आठवड्याचे वार सात,महिन्याची दिवस तीस किंवा ऐकतीस, वर्षाचे महिने बारा, घड्याळाचे तास बारा, साठ सेकंदाचा एक मिनिट,साठ मिनिटाचा एक तास तर चोवीस तासांचा एक दिवस असं बरंच काही त्या गणितांन शिकवलं.पाच पैसे,दहा पैसे, पंधरा पैसे,पंचवीस पैसे,पन्नास पैसे असा पैशाचा हिशोब शिकलोकलो. एक रुपया, दोन रुपये, पाच रुपये,दहा रुपये यांचे ज्ञान मिळाले. आईने वस्तू आणायला दुकानात पाठवलं तर दहावीची नोट दिली की, त्यातील वस्तू किती रुपयाची झाली? बाकी किती उरले?हे हाताच्या बोटावर लगेच करू लागलो. गावच्या बाजारात आई-अण्णांसोबत भाजीपाला घेतांना एक पाव,अर्धा किलो, एक किलोच्या वस्तू घेताना भाजी विक्रेत्यांच्या तराजूकडे मोजताना मापाकडे बघू लागलो. दोनसे पन्नास ग्रॅम म्हणजे एक पाव,अर्धा किलो म्हणजे पाचशे ग्रॅम तर एक हजार ग्रॅम म्हणजे एक किलो असं समजल्या मुळे, असं त्याच्या मोजण्याकडे लक्ष असायचं. खरच...! शाळेतील गणितामुळे जीवनाचं गणित व्यवस्थित जुळवायला शिकलो. वेळोवेळी व्यवहार करतांना समाजातील काही चुकीच्या व भ्रष्ट गोष्टीही लक्षात आल्या.

शंभर ते हजार पर्यंत आकड्यांची ओळख झाल्यावर साधारण तिसरी, चौथी मध्ये बे एके बे असे पाढे शिकलो. त्यातून बेरीज, वजाबाकी, गुणाकार,भागाकार करण्यास मदत झाली. जीवन जगण्यास पुरेसं गणित चौथीपर्यंत शिकलो. पुढील वर्गातील लसावी, मसावी,साईन कॉस थिटा, भूमिती भविष्यात शिकलोचं.मात्र पावलो पावली कामास येणार गणित चौथी पाचवी पर्यंत शिकलो. ते आयुष्यात वेळोवेळी उपयोगात येत आहे.तर कष्टाच्या कमाईतून घर कसं चालावावं,वैयक्तिक कौटुंबिक,खर्च कसा भागवायचा त्यामुळे जीवनाच्या गणिताची घडी बसण्यास मदत झाली.

असं हे वर्ग पहिलीच्या गणिताच्या आणि उजळणीच्या पुस्तकातीलएक दोनहे जगण्यासाठी पावलो-पावली उपयोगात पडणारं असून हिशोबासाठी उपयुक्त ठरलं.हेच जगण्यासाठी बळ देत आहे.या हिशोबाच्या दुनियेत पैशाचे महत्व शिकलो. व्यवहार,उसने-पासने त्यातून जगाची ओळख पटली.जीवनात पैसा सर्व काही नाही परंतु,बरंच काही आहे.याआर्थिक व्यवहारातून याच गणिताबरोबर गणितीय विचारातील व्यवहारी दुनियेची जाणीव झाली.

**समस्त गुरुजनांना प्रणाम...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## डोंबिवलीत चिरेबंदी वाडा बाप्पासाठी सजला

# राहुल महाडीक याची कलाकृती गणेशभक्तांना भावली

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.३१, ठाणे (डोंबिवली) :** माणुसकीचा ओलावा निर्माण करणारी, आपुलकीचे प्रतीक म्हणजेच कोकण भूमी, प्रत्येकाच्या मनामनात कणाकणात सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य रुजलेली इथे पाहायला मिळते. त्यात अधिक एकरूपता आणणारा चिरेबंदी वाडायेथील जीवनशैलीचा महत्त्वपूर्ण भाग समजला जातो. परंतु काळाच्या ओघात ही जीवनशैली कुठेतरी मागे पडली. मात्र आज हीच जीवनशैली आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकाला हवी हवीशी वाटत आहे.

कोकणचं हेच सांस्कृतिक वैभव आणि गेल्या अनेक पिढ्या,वाडवडिलांनी अनुभवलेली ही जीवनशैली जगासमोर आणण्याचे प्रयत्न रत्नागिरीतील मंडणगड तालुक्यातील सोवेली गावचे सुपुत्र कु.राहुल रविंद्र महाडीक या युवकाने गणेशोत्सवात गणपती आरास मधून केला आहे. डोंबिवली (दावडी) येथे वास्तव्यास असणारा राहुल महाडीक हा युवक कोणत्याही कलेचं शिक्षण नसताना केवळ आत्म विश्वासाच्या बळावर गेली ४ वर्षे सातत्याने गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी वेगवेगळ्या कलाकृती साकारून आरास बनवत असून ह्या वर्षी गणेशोत्सव २०२५ मध्ये त्याच्या नवीन संकल्पनेतून कोकणातील एकरूपता असणाऱ्या जीवनशैलीवर पर्यावरण पूरक अशी चिरेबंदी



वाडा ही कलाकृती साकारून अवघ्यांचे लक्ष वेधले आहे.

सदर गणपती बाप्पाची आरास राहुल याने त्याचे मित्र कुणाल नामदेव सरनोबत राहणार दावडी गाव, डोंबिवली (पूर्व) यांच्या घरी साकारली आहे,

काल्पनिक चिरांचा वाडा आरास मध्ये पूर्वी असलेली एकत्रित कुटुंब पध्दती आणि पूर्वीच्या काळात दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या वस्तू जसं जात,पाटा-वरवंटा, काठवट, केरसुणी, उखळ, रांजण, सुप, आदी वस्तू ज्या आताच्या डिजिटल युगाच्या तंत्रज्ञानातून लुप्त होत चालल्या आहेत त्यांची जागा ही इलेक्ट्रिक वस्तूंनी घेतली आहे, सदर आरास घराच्या हॉल मध्ये २२÷१२ फिट मध्ये साकारण्यात आली आहे.

लाकडी टेबल, लाकडी रिपा, लाल मातीची कौल,जातं , उखळ, हत्यार, रांजण, काठवट, पाटा-वरवंटा, अशा पर्यावरण पूरक वस्तुंचा वापर तसेच वॉटर कलर वापरून साकारण्यात आली आहे.

विशेषतः सदर बाप्पाची आरास साकारताना घराच्या कोणत्याही भिंतीचा आधार न घेता पूर्ण रीपांच्या आधारे उभा करण्यात आला आहे. सदर आरास कलाकृती साकरण्यास २५ दिवसांचा कालावधी लागला असून दैनंदिन जीवनातील ४ ते ५ तास देऊन पूर्ण करण्यात आली आहे. ह्या महत्वपूर्ण बाप्पाच्या आरास साठी माझे सहकारी हेमंत सरनोबत, श्याम सरनोबत, करण विशे आणि मित्र परिवार यांच्या सहकार्याने आणि लाडक्या बाप्पाच्या कृपेने सदर आरास साकरण्यात यश आल्याचे राहुल यांनी अक्षराज मीडियाशी बोलताना सांगितले. कोणतीही कला अवगत नसताना सदर गणपती बाप्पाच्या आरास मधून कोकणच्या चिरेबंदी वाड्याची जीवनशैली व कोकणच्या सांस्कृतिक वैभवाचे यशस्वी अशी चिरांचा वाडा कलाकृती साकारत जगाला दर्शन घडविले प्रति राहुल महाडीक याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# थोडक्यात

## वाई पोलिसांची शोध मोहीम; २० मोबाईल मालकांना परत

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.३१, वाई (सातारा) :** वाई शहर व परिसरातून गाळ झालेले २० म ोबाईल आणि एक टॅब वाई पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने जप्त केले आहेत. महाराष्ट्र तसेच इतर राज्यातून




सुमारे ४ लाख २० हजार रुपये किमतीचे मोबाईल शोधून ते संबंधित तक्रारदारांना परत देण्यात आले. वाईचे पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे यांच्या शुभहस्ते हे मोबाईल मूळ मालकांना परत देण्यात आली. यासाठी सातारा पोलीस अधीक्षक तुषार जोशी, अप्पर पोलीस अधीक्षक डॉक्टर वैशाली कडूकर, पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब भालचिम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी करण्यात वाई पोलिसांना यश आले. मोबाईल गहाळ होण्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत चालल्या होत्या. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, पोलीस कॉन्स्टेबल विशाल शिंदे यांना तातडीने छडा लावण्याचे आदेश जितेंद्र शहाणे यांनी दिले होते. त्यानुसार पोलीस पथकाने विविध राज्यातून मोबाईलचा शोध घेतला. या मोहिमेत हेमंत शिंदे, नितीन कदम, श्रावण राठोड, प्रसाद दुदुस्कर, महेश पवार यांनी शोध मोहिमेत योगदान दिले. गुन्हे प्रकटीकरण शाखेने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईलचा जलद गतीने शोध लावून ते परत दिले. तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले. वाई पोलिसांनी जानेवारी २०२४ पासून तब्बल ३०० हून अधिक गहाळ मोबाईल शोधून ते मालकांना परत दिले आहेत. वाई पोलिसांच्या या यशस्वी शोध मोहिमेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# गणेशोत्सवात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** श्री गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि उत्सव शांततेत व उत्साहात पार पडावा. यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजीदुपारी पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे महत्वाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.या बैठकीचे अध्यक्षस्थानी संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर हे होते. विशेष पोलीस म हानिरीक्षकांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात सोशल हार्मनी नावाने व्हॉट्सॲप गट तयार करण्यात आला आहे. या गटात जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य आणि मान्यवरांचा सम ावेश करण्यात आला आहे.सदर गटातील सदस्य, पत्रकार तसेच समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्याच्या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात आली.

उत्सवा दरम्यान कायद्याचे पालन न करणाऱ्या युवकांना गुन्हेगारीमुळे भविष्यावर होणारे दुष्परिणाम समजावून देत जबाबदारीने उत्सव साजरा करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच ध्वनीप्रदूषण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणार असून, मिरवणुकीदरम्यान धोकादायक लेझर लाईट्सचा वापर करणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील यांनी स्पष्ट केले की, श्री गणेश उत्सव हा श्रद्धा, आनंद आणि ऐक्याचा उत्सव असला तरी त्या काळात कायदा व सुव्यवस्थेची कसोटी लागते. तरुणाईच्या गर्दीतील उन्मादावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाला लोकसहभागाची साथ मि ळणे अत्यंत आवश्यक आहे. बैठकीत गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकीत नागरिकांचा सहभाग सुरक्षित राहावा, धार्मिक श्रद्धा आणि उत्साहाला बाधा येऊ नये यावर भर देण्यात आला. संदीप पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हंटले की, कायद्याचे उल्लंघन करणारे कोणतेही कृत्य सहन केले जाणार नाही. धार्मिक श्रद्धा व सामाजिक शांतता या दोन्ही गोष्टी प्रशासनासाठी समान महत्वाच्या आहेत.चंद्रपूर जिल्हा औद्योगिक दृष्ट्या प्रगतीशील होत असून, जिल्ह्याची ओळख शांतताप्रिय जिल्हा म्हणून कायम




ठेवण्याची जबाबदारी नागरिक, पत्रकार व प्रशासन सर्वांची आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, शांतता व शिस्त राखण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा. पोलीस यंत्रणा ही केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था नसून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असणारा घटक आहे. कायद्याचे पालन करून प्रशासनाला सहकार्य केले, तर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. भक्ती, श्रद्धा, आनंद व उत्साहासोबत जबाबदारीची जाणीव ठेवली, तर चंद्रपूर जिल्हा शांतताप्रिय जिल्हा म्हणून प्रचिती कायम ठेवून शिस्तबद्धतेचा आदर्श निर्माण करू शकेल, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीस पोलीस अधीक्षक म ुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर सुधाकर यादव, चिमूरचे उपविभागीय अधिकारी दिनकर ठोसरे, ब्रम्हपुरीचे राकेश जाधव, वरोऱ्याचे संतोष बाकल, गडचांदुरचे रविंद्र जाधव, जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालयातील शाखा प्रमुख, सोशल हार्मनी गटाचे सदस्य, जिल्हा शांतता समिती सदस्य, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार तसेच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पक्षाचा विचार प्रत्येक घरी पोहोचवून समाजहितासाठी काम करा - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** आजचा कार्यक्रम हा फक्त प्रवेशाचा किंवा औपचारिक कार्यक्रमाचा क्षण नाही, तर समाजहितासाठी नवे वचन देण्याचा क्षण आहे. भारतीय जनता पक्षात प्रवेश



करुन तुम्ही राष्ट्रसेवेच्या एका महान प्रवासाची सुरुवात केली आहे. भाजप हा केवळ सत्तेसाठीचा पक्ष नाही, तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणारा पक्ष आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास ही घोषणा म्हणजेच आपली विचारधारा आहे. या विचारधारेचा प्रसार प्रत्येक घरापर्यंत करणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. घुग्घुस येथे दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी पक्ष प्रवेश आणि भाजपच्या ज्येष्ठ नेतेयांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी काँग्रेस नेते प्रा.हेमंत उरकुडे यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. सोबतच सय्यद इद्रीस, नितू जयस्वाल, सविता गोहणे, मनिषा मेश्राम, उज्वला उईके, रमन तांद्रा, गुरुदास तंग्रपवार, मल्लेश बल्ला, किशोर धनकमारे, लक्ष्मी चांदेकर, सय्यद हुसेन अली, यांच्या नेतृत्वाखाली ४०० हून अधिक महिला व युवकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या कार्यक्रमाला भाजपचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, घुग्घुस शहराध्यक्ष संजय तिवारी, महामंत्री मनोज पाल, महामंत्री सविता दंढारे, तुषार सोम, नामदेव डाहुले, मंडळ अध्यक्ष विनोद खेवले, आशिष मासिरकर, अमोल शेंडे, राशिद हुसेन, सायली येरणे, संतोष नुने, राजकुमार बोरचेलवार, मुन्ना रोडे, संजय भांगडे, श्याम अगदारी, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, भाजप हा केवळ राजकीय पक्ष नाही तर तो एक राष्ट्रभक्तीची चळवळ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास ही घोषणा आज देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वेगाने जात आहे. प्रधानमंत्री, तुमच्या ऊर्जेने आणि तुमच्या प्रामाणिकपणाने आपण येणाऱ्या प्रत्येक निवडणूकीत भाजपाचा विजय निश्चित तरु, असा विश्वास यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला.

# कार्यकाळ संपून ही माजी नगरसेवक करत आहेत उद्घाटन सोहळे

## हा प्रकार आम्ही सहन करणार नाही - ॲड. रोहिदास मुंडे



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१,दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिकेचा कार्यकाळ २०२२ मध्येच संपला असून आजतागायत कोणतीही निवडणूक झालेली नाही. संपूर्ण कारभार केवळ आयुक्त आणि प्रशासक यांच्या अखत्यारित सुरू आहे. अशा परिस्थितीत काही माजी नगरसेवक स्वतःला माजी नगरसेवक म्हणून ओळख देत उद्घाटन सोहळे करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या संदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास बामा मुंडे यांनी संतापाचा सूर लावत म्हटलेनगरसेवकांचा कार्यकाळ संपला, मग हा बनावट 'मा. नगरसेवक' दर्जा कसा? उद्घाटन सोहळे करत स्वतः ला पुन्हा निवडून आल्याचा आभास निर्माण करून जनता दिशाभूल केली जातेय. हा प्रकार बेकायदेशीर असून जनतेशी थेट विश्वासघात आहे.

**ॲड. मुंडे यांनी माजी नगरसेवकांवर थेट बोट ठेवत म्हटले –**

अधिकार संपल्यानंतर ही उद्घाटन सोहळे करणे म्हणजे राजकीय पोळी भाजणे. हे लोक अजूनही स्वतःला नगरसेवक समजून फिरत असतील, तर त्यांनी आधी कायदा वाचावा. जनता याला फसू नये, आणि प्रशासनाने तातडीने कारवाई करावी.

**मुंडे यांनी इशारा दिला की –**

आम्ही या संदर्भात आयुक्त तसेच राज्य निवडणूक आयोगाला लेखी तक्रार करणार आहोत. जर वेळेत कारवाई झाली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलन छेडू. आवश्यक झाल्यास या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्यासही आम्ही मागे हटणार नाही.

मुंडे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे दिवा परिसरात मोठी खळबळ माजली असून, जनतेमध्ये माजी नगरसेवकांच्या अशा वागणुकीबद्दल संताप उसळला आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पशुवैद्यकीय अधिकारी वर्ग - १ परिक्षा उतीर्ण

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.३१, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील तरुण डॉ.सचिन बाबुराव गुमडे हे आपल्या मेहणतीच्या बळावर सन २०२४-२५ म ध्ये घेतलेल्या महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या पशुवैद्यकिय अधिकारी वर्ग १ ची परिक्षा



उतीर्ण होऊन आपल्या आईवडीलांचे स्वप्न साकार करुन ते मुक्रमाबादेत मागासवर्गिय विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केल्यामुळे मुक्रमाबाद सह परिसरातुन कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ.सचीन गुमडे या अगोदर आपली सेवा भारतातच नव्हे तर भारताच्या बाहेरसुद्धा किंगडम ऑफ सौदी अरेबिया या देशातसलग तीन वर्षाची सेवा देऊन ते सद्या हैद्राबाद येथे वेंकटेश्वरा प्रायव्हेट लिमिटेड येथे कार्यरत असुन ते बि.व्ही.एस.सी.अँड ए.एच.व एम.व्ही.एस.सी, नेट सुद्धा उतीर्ण असुन त्यांच्या या यशाबद्दल मुक्रमाबाद येथे राष्ट्रवादीचे अजितदादा गटाचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेवकर यांनी मुक्रमाबाद येथील प्रतिष्ठित व्यावसायिक लालू बोयवार यांच्या दुकानी व येथील प्रतिष्ठित व्यापारी संजय सावकार पंदिलवार व मित्र परिवार यांच्या तर्फे त्यांच्या संपर्क कार्यालयात शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी शंकरअप्पाखंकरे, शिवओम पाटील, उपसरपंच सदाशिव बोयवार, लक्ष्मण एन्मुलवाड, दादाराव गुमडे, लालू बोयवार, आमजद पठाण, ग्रामविकास अधिकारी संतोष गुमडे, पप्पु सावकार वट्टमवार, रामदास बोयवार, बालाजी बोयवार आदी उपस्थित होते.

# खाकी कर्तव्याची कहाणी; नवयुग उत्सव मित्र मंडळाची समाजप्रबोधनात्मक सजावट

**अक्षराज : मंगेश औंटी**

**दि.३१, नेरूळ (नवी मुंबई) :** नवयुग उत्सव मित्र मंडळ (एल.आय.जी.राजा) या नाम वंत मंडळाने यंदाही आपल्या आगळ्यावेगळ्या सादरीकरणातून गणेशोत्सवाला सामाजिक भान प्राप्त करून दिले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंडळाने चलचित्राच्या माध्यमातून खाकी कर्तव्याची कहाणी या विषयावर अनोखी सजावट साकारली आहे. पोलीस दलाच्या कठीण आणि निष्ठावान सेवेचा सामाजिक




दृष्टिकोनातून गौरव करत मंडळाने नागरिकांमध्ये कृतज्ञतेची भावना जागवली आहे. विविध दृश्यांतून पोलीस कर्मचाऱ्यांचे रोजचे आव्हानात्म क जीवन, जबाबदाऱ्या आणि समाजासाठी त्यांची भूमिका प्रभावीपणे उलगडली गेली आहे. या सजावटीद्वारे केवळ भक्तिभाव नव्हे, तर सम ाजप्रबोधनाचा ही प्रभावी संदेश देण्यात आला आहे. गणेशभक्तांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने या देखाव्याला भेट द्यावी, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.